# जिल्हा परिषद, हिंगोली
## सामान्य प्रशासन विभाग

Office : 02456-221636
Fax : 02456-221938
Email : ceozphingoli@gmail.com
ceozp.hingoli@maharashtra.gov.in


जाक्र/जिपहिं/साप्रवि/आस्था-४/कावि/१०८८/२०२५ दिनांक :- ०८/०९/२०२५

प्रेस नोट

अनुकंपा भरती बाबत अनुकंपाधारक उमेदवारांना आवाहन

शासन निर्णय दिनांक ३१ जुलै २०२५ नुसार सन-२०२५ साठी अनुकंपा धारक उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे. त्यानुसार अनुकंपा उमेदवारांची प्रतिक्षायादी जिल्हा परिषद हिंगोली च्या zphingoli.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

यामध्ये यादीतील अ.क्र. -०१ ते ६५ मधील नमुद उमेदवारांची अनुकंपा भरती प्रक्रियेसाठी गट-क व गट-ड करिता विकल्प भरुन घेण्यासाठी कॅम्प दिनांक- १०/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. नक्षत्र सभागृह जिल्हा परिषद हिंगोली येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

करीता जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत अनुकंपा प्रतिक्षायादीवरील उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी कागदपत्र पडताळणीसाठी व गट-क व गट-ड मधील विकल्प भरुण देण्यासाठी उपरोक्त दिनांकास वेळेवर त्यांचे शैक्षणिक व इतर मुळ कागदपत्रासह वेळेवर उपस्थित राहावे, त्याचप्रमाणे मुळ कागदपत्र सादर केली असल्यास सादर केलेली पोहोच व कागदपत्राची सत्यप्रतिसह उपस्थित राहावे,

वरीलप्रमाणे नेमून दिलेल्या दिवशी अनुकंपाधारक उमेदवार उपस्थित न राहिल्यास अथवा उपस्थित राहून विकल्पउ भरुन न दिल्यास गट-क मध्येच ठेवण्यात येईल व याची नोंद घ्यावी.

तरी उमेदवारांनी वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली प्रतिक्षासुचीनुसार उपस्थीत राहून विकल्प भरुन देण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांचे वतीने करण्यात येत आहे.

(नामदेव केंद्रे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र.)
जिल्हा परिषद हिंगोली